शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांचा पुरस्कार करणारे सायंदैनिक

# प्राजक्त

संस्थापक व आद्य संपादक : स्व परुषोत्तम कुलकर्णी

आम्ही भिडे
नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान
(खाजगी वितरण)

विशेषांक ऑगस्ट २०२१

Website : www.bhidekul.in
Email : office@bhidekul.in

वर्ष : 48 अंक : 89 कोल्हापूर सोमवार ता. 30 ऑगस्ट 2021 किंमत 2 रुपये ✲ पाने 4+4 Reg. No. KLR 136/21-23 Posted in Kolhapur RMS RNI NO. : M-6 (1457) / 70-RNI

नोंदणी क्रमांक (ई) - २०१४० वेबसाईट : **www.bhidekul.in**

## नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान, मुंबई

सार्वजनिक न्यास नोंदणी क्र. (ई) - २०१४०

**पुणे कार्यालय : द्वारा – ले. क. सुनिल वासुदेव भिडे**
**१४२६, सदाशिव पेठ, नीलसदन ए–२०१,**
**पुणे विद्यार्थी गृहासमोर, पुणे ४११०३०**
**मो. ९६२३०१७४४४**

**मुंबई कार्यालय : द्वारा – सौ. संपदा भिडे**
**ए ५०३, श्रीसाई शारदा हौसिंग सोसायटी,**
**भवानी शंकर रोड, दादर (पश्चिम),**
**मुंबई – ४०० ०२८. मो. ९८१९९ ५१३९१**

## निवडणूक सूचना, कार्यक्रम व संक्षिप्त मार्गदर्शिका

**✲ निवडणूक सूचना -**

वर्ष २०२१ ते २०२६ या पाच वर्षांच्या कालावधीकरिता प्रतिष्ठानचे घटना कलम क्र. १०.१, ११.१ आणि २६.६ नुसार विश्वस्त कार्यकारी मंडळाच्या सर्व ११ जागांसाठी, घटना कलम क्रमांक २३.८ नुसार एक जागा महिला विश्वस्तासाठी राखीव आहे. दिनांक २६ सप्टेंबर २०२१, रविवार, दुपारी १.०० ते दुपारी ३.०० या वेळेत, शेजार ज्येष्ठ नागरिक संघाचे अनंतराव चाफेकर समाज मंदिर, यशवंतनगर, तळेगाव दाभाडे, तालुका मावळ, पुणे - ४१० ५०७ येथे निवडणूक घेण्यात येणार आहे.

**✲ निवडणूक कार्यक्रम -**

१) दिनांक ५ सप्टेंबर २०२१ आणि ८ सप्टेंबर २०२१ ह्या दोन दिवशी सकाळी १०.०० ते दुपारी १२.०० या वेळेत विश्वस्त पदासाठी उमेदवारी अर्ज प्रत्येकी मूल्य रु. १०० रोख भरून प्रतिष्ठानच्या मुंबई आणि पुणे कार्यालयात मिळतील.

२) अनामत रक्कम रु. १,००० रोख भरून व पोचपावती घेऊन, त्याची नोंद उमेदवारी अर्जात करून ते दिनांक १२ सप्टेंबर २०२१ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी १२.०० या वेळेत पुणे कार्यालयात स्वीकारले जातील.

३) उमेदवारांनी, उमेदवारी अर्ज, सूचक व अनुमोदकाचे नाव, स्वाक्षऱ्या व सभासद क्रमांकासह बिनचूक भरावे.

४) चुकीची किंवा अपूर्ण माहिती, खाडाखोड आढळल्यास तो उमेदवारी अर्ज रद्द होईल.

५) उमेदवारी अर्जाची छाननी करून निवडणूक अधिकारी, पात्र व अपात्र उमेदवारांना दिनांक १२ सप्टेंबर २०२१ रोजी दुपारी १२.०० ते दुपारी २.०० या वेळेत, प्रत्यक्ष अथवा दूरध्वनी द्वारे सूचना देतील. अर्ज छाननीच्या वेळी उमेदवार हजर राहू शकेल.

६) उमेदवारी अर्ज मागे घ्यायचा असल्यास दिनांक १८ सप्टेंबर २०२१ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी १२.०० या वेळेत पुणे कार्यालयात उमेदवाराने उमेदवारी मागे घेतल्याचा लेखी अर्ज द्यावा.

७) उमेदवारांची अंतिम यादी दिनांक १९ सप्टेंबर २०२१ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी १२.०० या वेळेत पुणे कार्यालयात तयार होईल.

८) आजीव सभासदांची यादी पुणे कार्यालयात उपलब्ध आहे. (किंमत रु. २००)

९) निवडणुकीची वेळ संपल्यानंतर मतपेट्या सीलबंद करण्यात येतील. निवडणुकीचा निकाल त्याच दिवशी दुपारी ४.०० वाजता आयोजित प्रतिष्ठानच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत जाहीर करण्यात येईल.

१०) अनामत रक्कम जप्त झालेले उमेदवार वगळता अन्य उमेदवारांना, त्यांनी भरलेल्या अनामत रकमेचा धनादेश, पावती दाखवून दिनांक ३ ऑक्टोबर २०२१ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी १२.०० या वेळेत पुणे कार्यालयातून घेऊन जाता येईल.

**✲ संक्षिप्त निवडणूक मार्गदर्शिका -**

१) घटना कलम क्र. २३.९ आणि २३.१० नुसार दिनांक ३१ मार्च २०२० रोजी प्रतिष्ठानच्या पटावर असलेल्या सभासदांनाच विश्वस्त पदासाठी उमेदवारी अर्ज भरता येईल, तसेच सूचक किंवा अनुमोदक म्हणून सही करता येईल.

२) निवडणुकांचे नियम सर्वांनाच सारख्याच प्रमाणात बंधनकारक राहतील.

३) घटना कलम क्रमांक १२.८ नुसार सर्व वर्गातील सभासदांना मतदानाचा अधिकार आहे.

४) घटना कलम क्रमांक २३.१ नुसार निवडणुका गुप्त मतदान पद्धतीने होतील.

५) निवडणुकीच्या दिवशी हे सूचना पत्रक आणि कुठलेही सरकारी फोटो ओळखपत्र आणावे.

६) उमेदवाराने अवैध कृत्य केल्यास उमेदवार अपात्र ठरविण्यात येईल व त्यांनी भरलेली अनामत रक्कम जप्त होईल.

७) निवडणुकीच्या दिवशी उमेदवार निवडणूक अधिकारी ठरवतील त्या जागेवर बसतील.

८) निवडणुकीच्या दिवशी उमेदवारास कुठल्याही प्रकारचा प्रचार करता

**(पान २ वर पुढे चालू)**

येणार नाही.

९) ज्या उमेदवारास किमान मतसंख्या (शेवटच्या विजयी उमेदवाराच्या १०%) मिळणार नाही, अशा उमेदवारांची अनामत रक्कम जप्त केली जाईल.

१०) घटना कलम क्र. २३.३ नुसार जरूर पडल्यास ह्या अथवा पुढील निवडणुकीसाठी नियम करण्याचा अथवा बदलण्याचा अधिकार विश्वस्त कार्यकारी मंडळाकडे राहतील.

११) घटना कलम क्र. २३.५ नुसार पटावर असलेल्या एकूण आजीव सभासद संख्येच्या किमान २० टक्के मतदान झाल्यास ते मतदान मान्य करण्यात येईल. किमान २० टक्के मतदान न झाल्यास, विश्वस्त कार्यकारी मंडळ पुढील पाच वर्षांसाठी नवीन विश्वस्तांच्या नियुक्तीबाबत निर्णय घेतील.

१२) घटना कलम क्र. २४.५ नुसार निवडणुकीबाबत निवडणूक अधिकाऱ्यांचा निर्णय अंतिम आणि बंधनकारक राहील.

**(दिलीप वा. भिडे)**
**सचिव**

**अधिक माहितीसाठी दूरध्वनी क्रमांक ९६५७५४१२३६**

## नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान, मुंबई

**निवडणूक वेळापत्रक -**

* दिनांक - २६ सप्टेंबर, २०२१, रविवार.
* स्थळ - शेजार ज्येष्ठ नागरिक संघाचे अनंतराव चाफेकर समाज मंदिर, यशवंतनगर, तळेगाव दाभाडे, तालुका मावळ, पुणे - ४१० ५०७

निवडणूक वेळ - दुपारी १.०० ते दुपारी ३.०० वा.
मतमोजणी - दुपारी ३.०० ते ४.०० वाजता.

**वार्षिक सर्वसाधारण सभा – दुपारी ४.०० वा.**

**(कुमार वि. भिडे)**
**अध्यक्ष**

# अध्यक्षांचे मनोगत

**भिडे कुल बंधू-भगिनी व माहेरवाशिणींना नमस्कार**

**घटनेतील तरतुदीप्रमाणे दि. २६ सप्टेंबर २०२१ रोजी वार्षिक सर्वसाधारण सभा व निवडणूक घेऊन त्यानुसार नवीन कार्यकारिणी अस्तित्वात येणार आहे. सर्व आजीव सभासदांना सस्नेह सूचना व कार्यक्रम पत्रिका सोबत देत आहोत.**



प्रतिष्ठानचे अध्यक्षपद स्वीकारून ६ वर्षे झाली. २०२० मध्ये वार्षिक सभेमध्ये नवीन कार्यकारिणी अस्तित्वात येणार होती. परंतु कोविड महामारीचे संकट संपूर्ण जगात, देशावर आले. सरकारी बंधने, निर्बंधांमुळे मा. धर्मादाय आयुक्त यांचेकडून एक वर्षाची मुदतवाढ घेण्यात आली. ह्या कोविड महामारीमुळे काही भिडे कुलातील व्यक्तींचे निधन झाले. त्यांच्या दुःखात भिडे प्रतिष्ठान सहभागी आहे. ह्या महामारीमुळे आपण कोणतेही जाहीर कार्यक्रम करू शकलो नाही. तरी सुद्धा शैक्षणिक मदत, वैद्यकीय मदत दरवर्षीप्रमाणे दिली. गेल्या दोन वर्षात कोविड महामारी, अचानक होणारी वादळे व पुरामुळे होणारे नुकसान ह्याचा विचार करता आपत्कालीन निधीची तरतूद असावी किंवा ज्या भिडे कुलातील विद्यार्थी, विद्यार्थिनी परदेशात शिक्षण घेण्यासाठी जातात त्यांना काही प्रमाणात आर्थिक मदत देणे, अथवा मेडिक्लेमच्या माध्यमातून आजीव सभासदांना आर्थिक मदत अशा तऱ्हेने भिडे कुल बंधू-भगिनी व माहेरवाशिणींना, त्यांच्या पाल्यांना मदत करण्यासंबंधी बाबी विचाराधीन आहेत. विद्यार्थिनींसाठी प्रतिष्ठानकडे आर्थिक मदतीसाठी स्रोत आहेत परंतु विद्यार्थ्यांसाठी सुद्धा अशी मदत मिळण्यासाठी ह्या वर्षीपासून तरतूद केलेली आहे. नोकरी, व्यवसाय मार्गदर्शन ह्या माध्यमातून योजना राबविण्यासाठी प्रयत्नशील आहोत. आपल्याकडे सुद्धा काही मार्गदर्शक सूचना अथवा संकल्पना असल्यास प्रतिष्ठानचे सचिव दिलीप भिडे यांच्याकडे जरूर कळवाव्यात.

भिडे प्रतिष्ठानने सद्य परिस्थितीत सुमारे ६० लाखाचा निधी वेगवेगळ्या माध्यमासाठी वर्ग केला आहे. तसेच प्रतिष्ठानचे विश्वस्त व पदाधिकारी योग्य मार्गाने काम करीत असल्याने प्रतिष्ठानच्या प्रगतीचा आलेख चढता राहिला आहे. दर संमेलनात भिडे मंडळींनी पुरस्कृत केलेले पुरस्कार एका ठराविक दिलेल्या रकमेच्या व्याजातून प्रदान केले जातात. परंतू व्याजाचे दर दिवसेंदिवस कमी होत असल्यामुळे रोख रक्कम, स्मृतिचिन्ह याचा खर्च त्याच्या व्याजातून करणे अवघड होत आहे. त्यानुसार मूळ रकमेत वृद्धी होऊन प्रतिष्ठानला तोशीष होऊ नये म्हणून मी पुरस्कृत केलेल्या ‘कला व उद्योजक पुरस्कार’ देताना दहा हजार रुपये रोख मिळावेत यासाठी मूळ रकमेत दोन लाख रुपयांची माझ्याकडून वृद्धी करण्यात आली आहे. ह्याचा सर्वच पुरस्कार्त्यांनी साकल्याने विचार करावा असे वाटते. माझ्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात सर्व आजी-माजी विश्वस्त, पदाधिकारी तसेच भिडे बंधू, भगिनी आणि माहेरवाशिणींनी जे सहकार्य केले त्याबद्दल मी सर्वांचा आभारी आहे. माझ्या वयपरत्वे आणि तब्येतीच्या कारणास्तव मी अध्यक्ष ह्या जबाबदारीतून मोकळा होत आहे. तरी सुद्धा कोणत्याही वेळेस माझे मार्गदर्शन वा मदतीची गरज जिथे अपेक्षित असेल त्यासाठी मी सदैव कटिबद्ध आहे. असेच आपले सहकार्य व सहभाग वेळोवेळी प्रतिष्ठानला मिळत राहो हे विशेष नमूद करतो आणि मी इथे थांबतो.

**अध्यक्ष,**
नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान